PARLE MAHOTSAV
Organiser - ADV. PARAG ALAVANI, President, Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahostav.com

PARLE MAHOTSAV

**कृपया प्रसिद्धीकरिता**

## पार्ले महोत्सवाच्या माध्यमातून तरुणांच्या गुणांना वाव- देवेंद्रजी फडणवीस

**दि. २४.१२.२०१३**

मुंबईः भारतीय तरुणांमध्ये सुप्त दडलेले कलागुण आहेत फक्त त्यांना संधीची गरज असते. येणारा काळ हा तरुणांचा आहे. देशाचे भविष्य हे तरुणांच्या हाती आहे. ॲड. पराग अळवणी यांनी पार्ले महोत्सवाच्या माध्यमातून फक्त तरुणांनाच नव्हे तर आबालवृध्द सर्वांसाठीच व्यासपीठ उपलब्ध करुन दिले आहे, असे प्रतिपादन भाजपा महाराष्ट्र प्रदेश चे अध्यक्ष श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी पार्ले महोत्सवातील सचिन तेंडुलकर गौरवांगणात केले. या प्रसंगी देवेंद्रजी यांनी गेले १४ वर्षे उत्तरोत्तर लोकप्रिय होणाऱ्या पार्ले महोत्सवाचे आयोजन यशस्वीरित्या करणारे आयोजक ॲड. पराग अळवणी आणि टीमचे भरभरून कौतुक केले.

खेळडूंनी जिकंण्यासाठीच खेळावे, पण हार झाली तर ती खिलाडू वृत्तीनेच स्विकारावी, आणि भविष्यात चांगला खेळ खेळण्यासाठी तयारी करावी असा सल्ला क्रिडापट्टुंना आर.पी.आय.चे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांनी दिला. जनता सहकारी बॅकेचे संचालक श्री. अतुल बेडेकर यांनी पार्ले महोत्सवास प्रत्येकाने आवर्जुन भेट द्यावी, असे सांगितले. वॉली बॉल, थ्रो बॉल, कबड्डी, बॉक्स क्रिकेट या सांघिक सामन्यातील चुरशीचे खेळ पाहण्यासाठी पार्ले महोत्सवाच्या सचिन तेंडुलकर गौरवांगणात लाखोहून अधिक क्रिडा रसिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

व्हॉलीबॉल मध्ये आत्तापर्यंत ९० संघानी सहभाग घेतला आहे. हॉली बॉल मधील शिवछत्रपती पुरस्कार विजेते दिनकर देशपांडे व आतंराष्ट्रीय स्तराचे अभय कुर्वे यांनीही आपला खेळ सादर केला. आत्तापर्यंत कबड्डी सामन्यात २०० हून अधिक संघ राज्यभरातून सहभागी झाले आहेत तर बॉक्स क्रिकेट सामन्यात १०० हून अधिक संघ सहभागी झाले आहेत.

---

सदर पत्रक श्रीकृष्ण आंबेकर, कार्यालय प्रमुख, पार्ले महोत्सव यांनी प्रसिद्ध केले आहे.